आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२७ नोव्हेंबर २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- मुख्यमंत्रीपदाबाबत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जो निर्णय घेतील तो शिवसेनेला मान्य असल्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भूमिका

- हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विरोधी पक्षांच्या गदारोळानंतर संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- उद्योगपती गौतम अदानी यांच्यावरचे लाचखोरीचे आरोप गंभीर असून त्यांना अटक करावी, अशी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची मागणी

- बालविवाह मुक्त भारत अभियानाला आजपासून देशभरात सुरुवात

**आणि**

- राज्यात गारठा वाढला, कोकण आणि मध्य महाराष्ट्रात किमान तापमानात लक्षणीय घट

<><><><><>

मुख्यमंत्रीपदासाठी भाजपाचे ज्येष्ठ नेते, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी जो निर्णय घेतील त्याला शिवसेनेचा पूर्ण पाठिंबा आहे, असं शिवसेनेचे मुख्य नेते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केलं आहे. ते आज ठाण्यात बातमीदारांशी बोलत होते. मुख्यमंत्रीपदाचा चेहरा ठरवण्यासाठी आणि सरकार स्थापनेसाठी आपला कोणताही अडसर नाही, कसलीही नाराजी नाही असं आपण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना दूरध्वनीद्वारे कळवल्याचं शिंदे यांनी सांगितलं. मुख्यमंत्रीपदाच्या अडीच वर्षांच्या काळात आपली ओळख लाडका भाऊ अशी झाली याचं समाधान आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. महायुती सरकारच्या काळात केंद्राकडून कोट्यवधी

रुपयांचा निधी मिळाला, अनेक महत्वाचे प्रकल्प पूर्ण झाले याचा आनंद असून पुढच्या पाच वर्षांत महायुती म्हणून एकत्र काम करायचं आहे, असं शिंदे म्हणाले.

महायुतीच्या, राज्यातल्या प्रमुख नेत्यांची उद्या दिल्लीमधे, भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांच्याशी भेट होणार आहे, त्यात सरकार स्थापनेबाबत निर्णय होईल, असंही त्यांनी सांगितलं. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनीही याला दुजोरा दिला. आज मुंबईत बातमीदारांशी बोलताना त्यांनी सांगितलं, की संख्याबळाच्या आधारे मुख्यमंत्रीपदाबाबतचा निर्णय घेतला जातो. एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या भूमिकेबद्दल भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखऱ बावनकुळे यांनी त्यांचे आभार मानले आहेत. ते नागपूर इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. महायुतीमध्ये मुख्यमंत्रीपद महत्वाचं नसून राज्यातल्या जनतेचं कल्याण महत्वाचं आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

अदानी उद्योग समूहाच्या लाचखोरी प्रकरण आणि विविध मुद्यांवरून विरोधकांच्या गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज आज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. **लोकसभेचं** कामकाज सुरु झाल्यानंतर सभागृहात अदानी प्रकरण तसंच उत्तर प्रदेश आणि मणिपूरमधला हिंसाचार या मुद्द्यांवरून गदारोळ झाला. तर, **राज्यसभेत**, अदानी लाचखोरी प्रकरण, तसंच उत्तर प्रदेशातल्या संभल, आणि मणिपूर हिंसाचार प्रकरणी विरोधकांनी मांडलेला स्थगन प्रस्ताव अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळला. त्यावर गोंधळ सुरु झाल्यानं कामकाज प्रथम साडे अकरा वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

दरम्यान, उद्योगपती गौतम अदानी यांच्यावर अमेरिकेत लाचखोरीचे गंभीर आरोप असून त्यांना अटक करावी, अशी मागणी लोकसभेतले विरोधी पक्षनेते **राहुल गांधी** यांनी केली आहे.

**<><><><><>**

यापुढे निवडणुका मतपत्रिकेवर घ्याव्यात या प्रमुख मागणीसाठी कॉंग्रेस स्वाक्षरी मोहीम राबवणार आहे. कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पाटोले यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. यासंदर्भात नुकतीच दिल्लीत बैठक झाली. कॉंग्रेस अध्यक्ष मल्ल्लीकार्जुन खर्गे, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याशी आपण स्वतः चर्चा केली आहे. देशभरात या संदर्भात कॉँग्रेस जनआंदोलन करणार आहे. राज्यात दोन दिवसानंतर सह्यांची मोहीम सुरु केली जाईल. कोट्यावधी नागरिकांच्या सह्यांचं निवेदन राष्ट्रपती, प्रधानमंत्री, सरन्यायाधीश आणि निवडणूक आयोगाला देणार असल्याचं पटोले यांनी सांगितलं. यावेळी राज्यात स्पष्ट बहुमत मिळूनही अद्याप सरकार बनले नाही या घटनेचा त्यांनी निषेध केला. यावेळी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, आमदार विजय वडेट्टीवार यांच्यासह कॉंग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते. यावर, महाविकास आघाडी मतदान यंत्रावर अविश्वास दाखवून मतदारांचा अपमान करत असल्याची टीका भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. आपली मतं कमी का झाली, यावर त्यांनी चिंतन करावं, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

विकसित भारत युवा नेतृत्व चर्चासत्र या प्रश्नमंजुषेत भाग घेण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी तरुणवर्गाला केलं आहे. विकसित भारत ही चारस्तरीय स्पर्धा आहे. यात १५ ते २९ वयोगटातल्या व्यक्तीला भाग घेता येईल. २५ नोव्हेंबर ते ५ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या डिजिटल प्रश्नमंजुषेने या स्पर्धेला सुरुवात होईल.

विकसित भारत हे लक्ष्य साध्य करण्यात तरुणांचा लक्षणीय सहभाग असायला हवा. आपल्या नाविन्यपूर्ण कल्पना सरकारपर्यंत पोचवण्यासाठी त्यांना मिळणारी ही मोठी संधी आहे असं सांगत, या स्पर्धेत भाग घेण्याचं आवाहन प्रधानमंत्र्यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात केलं आहे.

**<><><><>**

रत्नागिरीत स्थानबद्ध असताना स्वातंत्र्यवीर सावरकर शिरगावमध्ये दामले यांच्या घरात राहायला गेले, त्या घटनेला आज १०० वर्षं पूर्ण झाली. सावरकरांच्या स्मृतींचा ठेवा असलेली ती खोली दामले कुटुंबीयांनी जपून ठेवली आहे. आमच्या रत्नागिरीच्या वार्ताहरानं याविषयी माहिती दिली...

**व्हीसी- अनिकेत कोनकर (२३ सेकंद)**

**<><><><>**

विकसित भारत २०४७ च्या संकल्पाला जोडूनच बालविवाहमुक्त भारताचं लक्ष्य असल्याचं केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांनी म्हटलं आहे. गेल्या दहा वर्षांत महिला सक्षमीकरणासाठी सरकारनं लिंगभाव समानतेसाठी जेंडर बजेटसारखी विविध पावलं उचलली आहेत, असं त्या म्हणाल्या. दिल्ली इथं त्यांच्या उपस्थितीत आजपासून देशभरात बालविवाह मुक्त भारत अभियानाची सुरुवात झाली. बालविवाहासारख्या प्रथेचं देशातून समूळ उच्चाटन करणं, हा या अभियानाचा उद्देश आहे. या कार्यक्रमात बालविवाह मुक्त भारत पोर्टलची सुरुवात करण्यात आली. जागरुकता वाढवणं, तसंच बालविवाहासारख्या घटनांची त्वरीत माहिती मिळण्यासाठी या पोर्टलचा उपयोग होणार आहे.

**<><><><>**

बालविवाह मुक्त भारत अभियानांतर्गत **धुळे** जिल्ह्यात ग्रामपंचायतींनी बालविवाह प्रतिबंधक ठराव मंजूर केले. गावकऱ्यांनी बालविवाह होणार नाही अशी

सामुहिक प्रतिज्ञा ग्रामसभांमध्ये घेतली. या ग्रामसभांमध्ये शाळांचे मुख्याध्यापक, आशा स्वयंसेवक, आरोग्य विभागाचे कर्मचारी, पोलिस पाटील, गावातील राजकीय, सामाजिक पदाधिकारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले. **गडचिरोली** जिल्हा प्रशासन, जिल्हा महिला आणि बाल विकास विभाग तसंच 'स्पर्श' संस्थेच्या संयुक्त विद्यमाने बालविवाह मुक्त भारत अभियानांतर्गत गडचिरोली शहरात बालविवाह मुक्त गडचिरोलीचा संकल्प करून जनजागृती रॅली काढण्यात आली. **चंद्रपुर**मध्ये बालविवाहाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या हेतूनं बालविवाह रोखण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रतिज्ञा देण्यात आली.

**<><><><><>**

मुख्यमंत्री सौर कृषी योजना २ अंतर्गत वाशीम जिल्ह्यातला पहिला सौर प्रकल्प मंगळूरपीर तालुक्यात हिसाई इथं कार्यान्वित झाला. या प्रकल्पाची क्षमता चार मेगावॅट असून हा अकोला परिमंडळातला तिसरा प्रकल्प आहे. वीस एकर शासकीय जमिनीवर उभारलेला हा प्रकल्प ३३ केव्ही शेलू उपकेंद्राशी जोडलेला आहे. त्यामुळे ३३ केव्ही शेलू उपकेंद्रातून निघणाऱ्या तराळा कृषी वीज वाहिनीवरील नऊ गावातील १०५३ शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा होईल.

**<><><><><>**

राज्यात गारठा वाढला असून गेल्या चोवीस तासात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय घट झाली. मराठवाडा आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी तापमानात किंचित घट झाली. राज्यात सर्वात कमी किमान तापमान अहमदनगर इथं ९ पुर्णांक ४ दशांश अंश सेल्सियस इतकं नोंदवलं गेलं. नाशिकमध्ये १० पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सियस तर निफाडमध्ये ८ पुर्णांक ४ दशांश अंश सेल्सियस तापमान आज नोंदवलं असं आमच्या वार्ताहरानं

कळवलं आहे. येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२७ नोव्हेंबर २०२४ - बुधवार